# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१८०　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक - ०८/०५/२०२४

## ईन्ना पॅलेस/कॅपिटल लॉजिंग ॲण्ड बोर्डिंगवर छापा करवाई करुन दोन पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.

दि. ०७/०५/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना ईन्ना पॅलेस/कॅपीटल लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग, गाळा नं. १२ शास्त्री इंडस्ट्रीयल इस्टेट, स्टेशन रोड समोर, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे या लॉजचे चालक/मालक, मॅनेजर व वेटर असे त्याचे लॉजमध्ये येणाऱ्या पुरुष गिऱ्हाईकांनी वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केल्यास वेश्यागमनाचा मोबदला व रुमभाडे असा एकुण ३,०००/- रु घेवुन वेश्यागमनासाठी मुली पुरवितात अशी बातमी मिळाली.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन ईन्ना पॅलेस/कॅपीटल लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग, गाळा नं. १२ शास्त्री इंडस्ट्रीयल इस्टेट, स्टेशन रोड समोर, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १६.१० वा छापा टाकला असता, नमुद लॉजिंगचे ताब्यातील मॅनेजर कम कॅशियर १) अरुण देवप्पा सालीयन, वय-५० वर्ष, २) वेटर सुरेन्द्र फरयादप्रसाद यादव, वय-५० वर्ष, ३) वेटर आरमा दोराई नाडार, वय-४८ वर्ष तसेच पाहिजे आरोपी मालक, चालक व वेश्यादलाल यांनी आपसात संगणम करुन दोन पिडित मुलींना वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या बोलीवर रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम मॅनेजर अरुण सालीयन याने स्वीकारल्याने त्यांना सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेवुन दोन पिडित मुलींची सुटका केली आहे. सदर बाबत सफौ/शिवाजी पाटील यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने पाहिजे आरोपी मालक, चालक व वेश्यादलाल तसेच ताब्यातील मॅनेजर कम कॅशियर आणि वेटर यांच्याविरुध्द नवघर पो.ठाणे गुन्हा रजि. क्र. I २९४/२०२४, भा.द.वि.सं. कलम ३७० (३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, प्रमाणे दि.०८.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, सफौ/राजु भोईर, सफौ/शिवाजी पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत, मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर व पोउपनिरी तुषार मोळोदे, पोहवा/जी. व्हि. जावळे, मपोशि/सुगिता चाबरे, नेम- नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे.